# व्यवसायाच्या माध्यमातूनही करिअर

## -नवनाथ गोरे यांचे मत

कुंडल : वार्ताहर



कुंडल येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्यावतीने 'फेसाटी'कार नवनाथ गोरे यांना साहित्य अकादमीचा युवा साहित्यिक पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना नवनाथ गोरे. यावेळी किरण लाड, प्राचार्य डॉ. के.एम. नलावडे, सचिव शहाजी लाड, डॉ. प्रताप लाड आदी.

व्यवसायाच्या माध्यमातूनही करिअर होऊ शकते; फक्त तो आत्मविश्वासाने केला पाहिजे, असे मत प्रसिद्ध कादंबरीकार नवनाथ गोरे यांनी व्यक्त केले.

कुंडलयेथीलक्रांतिअग्रणीजी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभप्रसंगी ते बोलत होते. क्रांती दूध संघाचे चेअरमन किरण लाड यांच्या हस्ते नवनाथ गोरे यांना त्यांच्या 'फेसाटी या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, ज्येष्ठ प्रा. डॉ. प्रताप लाड, जे. ए. पाटील उपस्थित होते.


गोरे पुढे म्हणाले, युवा पिढीने आपला आत्मविश्वास वाढविला पाहिजे, तरच जीवनात यशस्वी व्हाल, नोकरी असो वा व्यवसाय; त्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन हवा. याकरिता स्वतः बद्दल स्वतःलाच प्रश्न विचारावा सकारात्मक उत्तर मिळेल. ग्रामीण भागातही खूप बुद्धिमत्ता आहे. यशस्वी होण्यासाठी आपल्या परिस्थितीची जाण असली पाहिजे व सर्वांत महत्त्वाचे आपली बोलीभाषाच प्रभावी ठरते. याकरिता ती प्रभावशाली असणे गरजेचे असून स्वतःबद्दल बोलताना त्यांनी डॉ. रणधीर शिंदे हेच आपल्या यशाचे शिल्पकार असल्याचे सांगितले.

किरण लाड म्हणाले की ग. दि. माडगुळकरांसारख्या प्रतिभावंत व्यक्तीचे जीवन कुंडलमध्ये घडले. अशा गावामध्ये अनेक विद्यार्थी घडत आहेत. नवनाथ गोरेंनी जे अनुभवले ते लिहिले. प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनीही मनोगत व्यक्त केले. स्वागत डॉ. डी. एम. होनमाने यांनी केले. प्रा. एन. के. गुंड यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.

यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होत्या.

# जी.डी. बापू यांचे कतृत्व नेहमीच प्रेरणादायी

## डॉ. सी.टी. कारंडे



कुंडल, ता, पलूस येथील क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या वर्धापनदिना निमित्त आयोजीत कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डा. सी.टी. कारंडे यावेळी उपस्थित किरण लाड, सचिव शहाजी लाड, चंद्रकांत गेकडे प्राचार्य डा. के. एम. नलावडे आदि

कुंडल दि.१३(वार्ताहर) - क्रांतीअग्रणी जी.डी. बापूंचे कृतीत्व व कृतत्व च प्रेरणादायी असून त्यांचा आदर्श पुढच्या पिढीने घेणे आवश्यक असून त्यांच्यासारख्या क्रांतिकारकांचे विचारच या पुढील पिढीला दिशा देणारे ठरतील असे मत मिरज महाविद्यालय, मिरज चे प्राचार्य डॉ. सी.टी. कारंडे यांनी व्यक्त केले. ते क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या विसाव्या वर्धापनदिना निमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणुन बोलत होते, यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष व संस्थेचे समन्वय समितीचे सचिव किरण तात्या लाड, सचिव शहाजी अण्णा लाड, सह. सचिव प्रा. चंद्रकांत गेकंड, प्राचार्य डा. के.एम. नलावडे आदि मान्यवर उपस्थीत होते.

डॉ. कारंडे पुढे म्हणाले की स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यासाठी लढणारे योद्धे घडविले आता या ठीकाणी ते स्वातंत्र्य अबाधित ठेवणारे योद्धे तयार करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची असून ग्रामिण भागातील मुलांच्याकडे नेतृत्वगुण व मैदानी खेळातील कौशल्य असेल फक्त आपण त्यांना संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. आज असताना आपल्या महाविद्यालयाच्या वर्धापनदिन साजरा करणे

हा आपल्या सर्वांच्या दृष्टीने सर्वांत आनंदाचा क्षण असतो.

यावेळी किरण लाड म्हणाले की आजचे शिक्षण नोकरी साठी घेतले जात आहे मात्र या शिक्षणातून ज्ञान मिळवून युवा पिढी सुसंस्कृत बनविण्याचे काम आपणा सर्वांचे आहे.

१९९८ साली स्व. बापूसाहेबांच्या नावाने व अरुण अण्णांच्या प्रेरणेने प्रा. डा. पतंगराव लाड यांच्या सह सर्वांच्या प्रयत्नातून सुरु झालेल्या या महाविद्यालयाला महाविद्यालयाला [illegible] व आता मायक्रो [illegible] सुरु असून इथला सर्व स्टाफ, व्यवस्थापन व गावातील नागरिकांच्या [illegible] प्रयत्नातून महाविद्यालयाची वाटचाल यशस्वीपणे सुरु आहे.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डा. के. एम. नलावडे यांनी केले तर सूत्रसंचलन कु. तनुजा पाटे यांनी केले, आभार डा. बी. डी. वाघमारे यांनी मानले.

यावेळी माजी एन्युकेशन सोसायटीचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ.बी.डी. वाघमारे, प्रा. जगन्नाथ पाटील, तसेच सर्व

# जी.डी.बापूंचा आदर्श पुढच्या पिढीने घ्यावा


## प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे : ग्रामीण भागातील मुलांना संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे

वार्ताहर
कुंडल

क्रांतीअग्रणी जी.डी. बापूंचे कृतीत्व व वृक्तत्व व प्रेरणादायी असून त्यांचा आदर्श पुढच्या पिढीने घेणे आवश्यक असून त्यांच्यासारख्या क्रांतिकारकांचे विचारच या पुढील पिढीला दिशा देणारे ठरतील, असे मत मिरज महाविद्यालय, मिरजचे प्राचार्य डॉ. सी.टी. कारंडे यांनी व्यक्त केले. ते क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या विसाव्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

यावेळी क्रांती दुध संघाचे अध्यक्ष व संस्थेचे समन्वय समितीचे सचिव किरण तात्या लाड, सचिव शहाजी अण्णा लाड, सह. सचिव प्रा. चंद्रकांत रोकडे, प्राचार्य डॉ. के.एम. नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. कारंडे म्हणाले, स्वांतत्र्यपूर्व काळात स्वांतत्र्यासाठी लढणारे योद्धे घडविले आता या ठिकाणी ते स्वातंत्र्य अबाधित ठेवणारे योद्धे तयार करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची असून ग्रामिण भागातील मुलांच्याकडे नेतृत्वगुण व मैदानी खेळातील कौशल्य आहेत फक्त आपण त्यांना संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. आज महाविद्यालया पुढील व शैक्षणिक संस्था पुढील अडचणी वाढत असतानाच आपल्या



कुंडल : महाविद्यालयाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. सी. टी. कारंडे, किरण लाड, शहाजी लाड आदी

महाविद्यालयाचा वर्धापनदिन साजरा करणे हा आपल्या सर्वांच्या दृष्टीने सर्वात आनंदाचा क्षण असतो.

यावेळी किरण लाड म्हणाले, आजचे शिक्षण नोकरीसाठी घेतले जात आहे त्यातून काय नोकरीसाठी फायदा होतो का पाहिल जाते. मात्र या शिक्षणातून ज्ञान मिळवून युवा पिढी सुसंस्कत बनविण्याचे काम आपणा सर्वांचे आहे.

१९९८ साली स्व. बापूसाहेबांच्या नावाने व अरुण अण्णांच्या प्रेरणेने प्रा. डॉ. प्रताप लाड यांच्यासह सर्वांच्या प्रयत्नातून सूरु झालेल्या या महाविद्यालयाला आज वीस वर्षे पुर्ण झाली असून फक्त कला शाखेवर सुरु झालेल्या महाविद्यालयात बी. कॉम, बी.सी.ए. व आता सायन्स शाखा सुरु असून इथला सर्व स्टाफ, व्यवस्थापन व गावातील नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नातून महाविद्यालयाची वाटचाल यशस्वीपणे सूरु आहे.

यावेळी कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे यांनी केले. सूत्रसंचालन तनुजा माने यांनी केले. आभार डॉ. बी.डी. वाघमारे यांनी मानले. यप्रसंगी गांधी एज्युकेशन सोसायटीचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. बी.डी. वाघमारे, ज्येष्ठ प्रा. जगन्नाथ पाटील, तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.